Maharashtra State Board of Secondary &
Higher Secondary Education S.R.No.8324
Final Plot No. 178,179, Near Balchitrawani
Behind Agharkar Research Institute,
Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ स.नं.८३२४, फा.प्लॉट नं.
१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं/परीक्षा–८/ ४६०७
पुणे – ४११००४
दिनांक – २८ नोव्हेंबर २०२४

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी. ) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेषअतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

संदर्भ :– १. शासनाचे पत्र क्र.एसएससी–२००२(६६/०२)/उमाशि–२ दिनांक २३ एप्रिल, २००३.
२. शासनाचे पत्र क्र.एसएससी–२०११(१८५/११)/उमाशि–२ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३.
३. क्र.रा.मं/परीक्षा–८/४५५४ दि. २५ नोव्हेंबर २०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ९३ अन्वये फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि. ३०/११/२०२४ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु. ५०/– याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु. १००/– विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. २०/२/२०२५ पर्यंत रु.२००/– प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षा दि. २१/०२/२०२५ रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा | रविवार दिनांक ०१/१२/२०२४ ते शनिवार दिनांक ०४/०१/२०२५ | रविवार दिनांक ०५/०१/२०२५ ते रविवार दिनांक १९/०१/२०२५ | सोमवार दिनांक २०/०१/२०२५ ते गुरूवार दिनांक २०/०२/२०२५ |

....२....

१) सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बॅंकेच्या Virtul Account मध्ये कोणत्याही बॅंकेद्वारे त्याच दिवशी **online** पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application status मध्ये Send to board व Payment status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. शाळेने व कनिष्ठ महाविद्यालयाने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधीत विलंबाची यथायोग्य फी संबधीत शाळेकडून घेण्यात यावी.

२) त्याचप्रमाणे **आवेदनपत्रामध्ये** नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत **Prelist** च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास **Online पद्धतीने १० डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्याबाबत माध्यमिक शाळांना सूचित करण्यात यावे.**

३) प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित माध्यमिक शाळाप्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

४) मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

५) सोबत जोडलेल्या विहीत तक्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांची शिफारस व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतही सर्व माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात यावे.

६) राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी दिनांक २०/०२/२०२५ पर्यंत घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी **देणे शक्य होईल अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदनपत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–४

क्र. कोविमं/माध्य. परीक्षा /3685
दिनांक : 02 / 12 / 2024
03 DEC 2024

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हे

सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, फेब्रु.-मार्च 2025 विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब /अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ---------------------------

विभागीय मंडळाचे नावः ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः -----------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------------

२) शाळेचे नाव व पत्ता : -------------------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : ----------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार    ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती    ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. ------------------------  २. --------------------------

३. ------------------------  ४. --------------------------

५. ----------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोख/ चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस -------------------------------------

-------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का